| | | |
|---|---|---|
| | **महाळुंगे MIDC पोलीस स्टेशन,**<br>**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.**<br>**फोन क्रमांकः 7028535323.** | |

# प्रेस नोट. दि. ०८/०४/२०२५.

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे माध्यमातुन

## " मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचा १०० दिवस कृती आराखड्याचे अनुषंगाने पोलीस विभाग व कंपनी प्रतिनिधी यांची बैठक. "

दिनांक ०७/०१/२०२५ रोजी पासुन मा. मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांचा १०० दिवस कृती आराखड्याचे अनुषंगाने सरकारी कार्यालयांकरीता ७ कलमी कार्यक्रम आयोजित करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. सदर कार्यक्रमा अंतर्गत महाराष्ट्र राज्यामधील औदयोगिक विकासाला चालना मिळणेकरीता औद्योगिक सुरक्षा वाढीस लावण्याचे दृष्टीने औद्योगिक समुहांशी समन्वय साधणे हे देखील लक्ष दिलेले आहे.

त्याअनुषंगाने पोलीस विभाग व कंपनी प्रतिनिधी यांची दि. ०८/०४/२०२५ रोजी सकाळी १२/०० ते १३/३० वा. चे दरम्यान ह्युंडाई कंस्ट्रक्शन कंपनी, मिटींग हॉल, खालुंब्रे, ता. खेड, जि. पुणे, येथे पोलीस विभाग व कंपनी प्रतिनिधी यांची श्री. विनयकुमार चौबे, मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, यांचे प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस १) श्री. बापु बांगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड, २) डॉ. शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०३ पिंपरी चिंचवड, ३) श्री. विशाल हिरे, सहा. पोलीस आयुक्त, इंडस्ट्रियल ग्रिव्हियन्स सेल तथा गुन्हे शाखा, ४) श्री. राजेंद्रसिंह गौर, सहा. पोलीस आयुक्त, चाकण विभाग, ५) श्री. सतिश चौडेकर, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी विभाग, ६) श्री. दिलीप शिंदे, उप अभियंता, एनएचएआय, ७) श्री. निखील वाळके, सहा. कामगार आयुक्त, माथाडी बोर्ड, तसेच श्री. नितीन गिते, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, श्री. देवेंद्र चव्हाण, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, इंडस्ट्रियल ग्रिव्हियन्स सेल हे हजर होते.

डॉ. श्री. शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०३, यांनी सदर बैठकीची प्रस्तावना केली. त्यानंतर वरील मान्यवर यांनी उपस्थित कंपन्याचे प्रतिनिधींशी थेट संवाद साधुन, त्यांच्या अडीअडचणी जाणुन घेवुन त्याचे निराकरण करण्यात आले. त्यामध्ये विशेषतः मा. मुख्यमंत्री यांचे औद्योगिक धोरण, रस्त्यांची परीस्थिती, ट्रॅफिक जॅम, एमआयडीसी मध्ये झालेले अतिक्रमण, माथाडी कायदा, इत्यादी महत्वाच्या विषयांवर चर्चा झाली. त्यानंतर माथाडी बोर्डाचे श्री. निखील वाळके यांनी माथाडी कायद्यात होत असलेल्या नविन बदलांबाबत उपस्थितांना माहिती देवुन मार्गदर्शन केले.

श्री. विनयकुमार चौबे, मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, यांनी उपस्थित कंपनीचे प्रतिनिधी यांना संबोधीत करताना खालील नमुद मुद्यांवर मार्गदर्शन केले.

१. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामधील महाळुंगे भागातील औद्योगिक परिसरात शांतता अबाधीत रहावी याकरीता पोलीस प्रशासन पुर्णतः औद्योगिक कारखानदारीच्या मागे उभे आहे.
२. औद्योगिक तक्रारीचे तात्काळ निवारण होणेकरीता पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे अंतर्गत औद्योगिक तक्रार निवारण कक्षाची (इंडस्ट्रियल ग्रिव्हियन्स सेल) स्थापना करण्यात आलेली असुन, सदर कक्षाकरीता सहा. पोलीस आयुक्त दर्जाचे अधिकारी यांची नेमणुक केलेली आहे.
३. कामगार तसेच नागरीकांनी ११२ हा क्रमांक डायल केल्यानंतर अंदाजे पुढील ५ ते ६ मिनीटात त्यांना पोलीस मदत उपलब्ध होते. औद्योगिक क्षेत्रातील व्यक्तींनी सदर सेवेंचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. तसेच जास्तीत जास्त प्रसार करावा.

४. कंपनी व्यवस्थापनाने कंपनीच्या आतील भागाप्रमाणेच कंपनीच्या बाहेरील जागेमध्ये, सार्वजनिक रस्त्यावर चांगल्या दर्जाचे हाय डेफिनेशन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आवाहन करुन सदर कॅमेरे यांची साठवणुक क्षमता किमान १५ ते ३० दिवसांची असावी अशी सुचना केली.
५. आपणास कोणीही त्रास देत असेल, दादागीरी, धमकी करत असेल, इत्यादी त्रास देत असेल, तर स्थानिक पातळीवर महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशनला तक्रार द्यावी, तसेच पुढे सहा. पोलीस आयुक्त, चाकण विभाग, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०३ यांचेकडे सुध्दा तक्रार देवु शकता, तसेच औद्योगिक तक्रार निवारण कक्ष (इंडस्ट्रियल ग्रिव्हियन्स सेल) येथे सुध्दा तक्रार करु शकता.
६. कंपनी व्यवस्थापनाने त्यांचे कामगारांचे मोटारसायकल व चारचाकी गाड्या ह्या कंपनीचे बाहेर रोडवर पार्किंग न करता, कंपनीचे गेटचे आत पार्किंगची सोय करावी, जेथे पार्किंग करणे शक्य नसल्यास तेथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे तसेस सुरक्षा रक्षक नेमण्यात यावा.
७. कंपनी व्यवस्थापनास काहीएक तक्रार असल्यास, त्यांनी पुढे येवुन तक्रार दिल्यास, पोलीस विभागाकडुन त्यांना तात्काळ मदत मिळुन, गुन्हेगारांवर कडक कायदेशिर कारवाई करण्यात येईल, असे सांगुन, महाळुंगे एमआयडीसीमध्ये भयमुक्त वातावरण ठेवण्याचा उद्देष असल्याचे सांगीतले.

सदर बैठकीस पोलीस विभागाकडील अधिकारी तसेच MIDC विभाग, NHAI विभाग व माथाडी बोर्ड या विभागांचे अधिकारी देखील उपस्थित होते. सोबत चाकण एमआयडीसीमधील महत्वाच्या कंपन्यांचे प्रतिनिधी ज्यामध्ये ह्युंडाई कंपनीचे श्री. मनिष फणसाळकर व प्रकाश धोंडगे, बजाज कंपनीचे श्री. अनिल घुडेकर, टेट्रा पॅक कंपनीचे श्री. संतोष सोनटक्के, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रिजचे सचिव श्री. दिलीप बटवाल व एमआयडीसीमधील विविध कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. श्री. बापु बांगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड, यांनी सर्वांचे आभार मानुन, सदर बैठकीची सांगता झाली. नमुद बैठकीकरीता सुमारे ११५-१२० कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**(डॉ. शिवाजी पवार)**
**पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- III,**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.**